पुणे वनवृत्तामधील भांबूर्डा वनपरिक्षेत्रातील वनविभागाच्या ताब्यातील मॅफकोच्या जुन्या इमारतीची विशेष दुरुस्ती करण्याच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. वनबां-२०१७/प्र.क्र.४५५/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०२ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा :-</u> (१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष २४(३)/प्र.क्र.११५/७५९/२०१७-१८, दिनांक २८.११.२०१७
(२) उपवनसंरक्षक (प्रा.), पुणे यांचे क्रमांक:अ.८/CAMPA/३११/१८, दि.३१.०१.२०१८

प्रस्तावना:-

पुणे वनवृत्तामधील भांबूर्डा वनपरिक्षेत्रातील वनविभागाच्या ताब्यातील मॅफकोच्या जुन्या इमारतीची विशेष दुरुस्ती करण्याच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या बाबी विचारात घेऊन वनअभियंता, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्याकामाचे रू.४८,०९,१३०/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक संदर्भाधिन पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत शिफारशीसह विनंती केली आहे. संदर्भ क्र.२ नुसार सदरचे कामे कॅम्पा अंतर्गत उपलब्ध अनुदानातून घेण्यात येणार आहे. त्यानुसार या कामासाठी रू.४८,०९,१३०/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पुणे वनवृत्तामधील भांबूर्डा वनपरिक्षेत्रातील वनविभागाच्या ताब्यातील मॅफकोच्या जुन्या इमारतीची विशेष दुरुस्ती करण्याच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या बाबी विचारात घेऊन वनअभियंता महाराष्ट्र ,राज्यनागपूर , यांनी तयार केलेल्या रु.४८,०९,१३०/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सदरचा खर्च महसूल व वन विभागाकडील उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा, या अटीच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दिलेली आहे. त्यानुसार सोबत जोडलेल्या "प्रपत्र-अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच खालील अटींच्या अधीन राहून शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर बांधकामाच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१४/प्र.क्र. ९६/इमा-३, दिनांक ८.७.२०१४ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. प्रस्तुत कामाचा आरसीसी आवार भिंतीसाठी सकल्पन तयार करुन त्यास सक्षम अधिकारी यांची मंजूरी घ्यावी. तसेच प्रस्तुत नस्ती सोबतच्या अंदाजपत्रकावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घ्यावी.

३. काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

४. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजूर करूनच काम हाती घ्यावे.

५. प्रत्यक्ष काम करते वेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही/२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१० जानेवारी २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. सदरची कामे कॅम्पा अंतर्गत उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावीत.

७. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत तरतूद तसेच प्रचलित कायदे / नियम संदर्भाधिन तरतूदींचा भंग होणार नाही. तसेच कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

हे आदेश शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र १०.०८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५ मे, २००९, वित्तीय अधिनियम नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पाच नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका अंतर्गत प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार, अ.क्र. १, परिच्छेद क्र. १३४ नुसार विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सहमतीने, निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०२११३३०९००१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijaykumar Vasudeo Patil

Digitally signed by Vijaykumar Vasudeo Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b1fa488256513b9e2a5b0085040486cc2b67ff77bb697c031c8d3ba4aaf6e350, cn=Vijaykumar Vasudeo Patil
Date: 2018.02.02 11:37:02 +05'30'

(वि. वा. पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.
५. उप वनसंरक्षक (प्रा.), पुणे

६. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०.फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

“प्रपत्र-अ”

शासन निर्णय क्र.वनबां-२०१७/प्र.क्र.४५५/फ-९, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१८ सोबतचे प्रपत्र-अ

NAME OF WORK :- REPAIRS TO MAFCO BUILDING AT BHAMBURDA IN BHAMBURDA RANGE OF PUNE DIVISION

RECAPUTILATION SHEET

(A)	Sub estimate	**Amount in Rs.**
	Repairs to Mafco Building at Bhamburdain Bhamburda Range of Pune Division	33,32,544.00
(B)	Sub estimate	
	Plinth Protection Band	3,52,287.00
(C)	Quality Control Charges	14,500.00
	Total:-	**36,99,331.00**
(D)	Add 4% Contingencies	1,47,973.00
(E)	Add 11% Eletrification	4,06,926.00
(D)	Add 15% External Water Supply (Corporation Water Connection Charges, Plumbing Charges etc.)	5,54,900.00
	Total Amount :-	**Rs.48,09.130.00**

****